
# CREDIT OPTIONS FOR TOILET CONSTRUCTION



Do you have your 'Own Toilet'?



**No!!**

Why?

**No Money ???**



## If you don't have money, have you ever thought of taking a loan for constructing your own toilet?

**We take loans for house, health, education, vehicles etc...why not Toilet?**

SBM + SMA Subsidy: Rs. 12,000

Total Cost Rs. 35,000



Credit requirement: Rs. 23,000

**Why not take Loan for Toilet?**

**Where do we get a loan from? Look back for some options:**

## People who have taken loans for Toilet construction

Mrs. Suvarna Lokhande, a resident of Sinnar runs a tailoring business. She is a member of a SHG since 2008. She took a **loan from the SHG to construct a toilet.** She has already repaid the loan fully.

Suvarna received a title of **'Swachhata doot'** from the Government of Maharashtra in October 2015.

3 women from 2 SHGs in Wai have received loans to construct toilets from the Wai Urban Cooperative Bank. Each woman received a loan of Rs. 20,000.

The loans have to be repaid in one year and carry an interest rate of 11%. The SHG women were guarantors for one other. No other collateral was required.

All three women have completed the construction of their toilets and are using these regularly.

# CREDIT OPTIONS FOR TOILET CONSTRUCTION

## Where can you get a loan from?? Here are some of the options…

| | Rate of Interest (%) | Documents Required | Maximum loan amount | Collateral | Repayment Period | Guarantors required? |
|---|---|---|---|---|---|---|
| **Scheduled commercial banks** | 10-15% | •Identity and address proof<br>•Income proof<br>•Photograph | Rs. 150,000 | Not required for loans up to Rs. 100,000 | 1 to 5 years* | No |
| **Scheduled commercial banks (for SHGs)** | 9-12% | •Identity proof<br>•Photograph | Rs. 20,000 | No | 1.5 Years* | Group guarantee required in some cases |
| **Credit Coop Society/ Coop banks** | 10% - 20% | •Identity and address proof<br>• Income proof<br>• Photograph | Rs. 20,000-40,000 | Not required up to Rs. 25,000 | 1 to 5 years | Yes |
| **Microfinance Institutions** | 20% - 28% | •Identity and address proof<br>•Photograph | Rs. 40,000 | Not required | 1 to 2 years | Yes (Group Guarantee) |
| **Housing Finance Institutions** | 15% to 21% | •Identity and address proof<br>• Income and employment proof<br>• Photograph<br>• Property papers<br>• Details of past debt | Rs. 50,000 | Required (Insurance policy or mortgage in some cases) | 2 to 7 years | No |

* Repayment period may differ with type and amount of loan

Identity proof can be PAN card, Voter ID, driving license etc. Address proof can be property tax or electricity bill, ration card, bank statement, etc).
If the applicant or household does not have income proof, the agency maybe willing to assess income using indirect means.

स्वच्छ भारत
एक कदम स्वच्छता की ओर

**Go to a nearest agency and inquire about the Loan Process…**


स्वच्छ महाराष्ट्र अभियान
सप्तपदी स्वच्छतेची

Disclaimer: This information is provided to facilitate borrowing for toilet construction. The *Nagarpalika or any other government agencies are not responsible for accuracy of this information. The borrower will have to ascertain facts and borrow on their own.*

# शौचालय बांधण्यासाठी कर्ज घेण्याचे पर्याय




## तुमच्याकडे 'स्वतःचे शौचालय' आहे का?



**नाही!!?**

का?

**पैसे नाहीत ???**



## जर तुमच्याकडे पैसे नसतील तर तुमचे स्वतःचे शौचालय बांधण्यासाठी तुम्ही कर्ज घेण्याचा विचार केला आहे का?

**आपण घर, आरोग्य, शिक्षण, वाहने इत्यादींसाठी कर्जे घेतो...मग शौचालयासाठी का नाही?!**

स्वच्छ भारत अभियान
आणि स्वच्छ महाराष्ट्र
अभियान अनुदान:
रु. १२,०००

एकूण खर्च
रु.
३५,०००



आवश्यक कर्ज /
कर्जाऊ रक्कम:
रु. २३,०००

**शौचालयासाठी कर्ज का घेऊ नये?**

**आपल्याला कर्ज कोणाकडून मिळू शकते? काही पर्यायांसाठी मागील बाजूस पाहा:**

## शौचालय बांधण्यासाठी कर्जे घेतलेल्या व्यक्ती

सौ. सुवर्णा लोखंडे या सिन्नरच्या रहिवासी असून त्यांचा शिवणकामाचा व्यवसाय आहे. २००८ पासून एका बचत गटाच्या त्या सदस्य आहेत. **शौचालय बांधण्यासाठी त्यांनी बचत गटाकडून कर्ज घेतले.** आता त्यांनी संपूर्ण कर्जाची परतफेड केली आहे.

महाराष्ट्र शासनाकडून त्यांना ऑक्टोबर २०१५ मध्ये **"स्वच्छता दूत"** म्हणून गौरविले गेले !

वाई शहरातील २ बचत गटांमधील महिलांना त्यांची स्वतःची शौचालये बांधण्यासाठी वाई अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेकडून कर्जे मिळाली आहेत. प्रत्येक महिलेला रु. २०,००० एवढे कर्ज मिळाले.

कर्जे ११% व्याज दराने घेतली असून ती एका वर्षात परत फेडायची आहेत. बचत गटातील महिला एकमेकांसाठी हमीदार आहेत. इतर कोणत्याही जादा तारणाची आवश्यकता नाही.

शौचालयाचे बांधकाम आता पूर्ण झाले असून ते नियमितपणे वापरले जात आहेत.

# शौचालय बांधण्यासाठी कर्ज घेण्याचे पर्याय

## आपल्याला कर्ज कोणाकडून मिळते? काही पर्याय असे आहेत.....

| | व्याजदर (%) | आवश्यक कागदपत्रे | कमाल कर्ज रक्कम | जादा तारण | परतफेडीचा कालावधी | हमीदाराची आवश्यकता आहे? |
|---|---|---|---|---|---|---|
| शेड्युल्ड व्यावसायिक बँका (कमर्शिअल बँक्स) | १०% - १५% | • ओळख आणि निवास पुरावा<br>• मिळकतीचा पुरावा<br>• फोटो | रु. १५०,००० | रु. १००,००० च्या कर्जापर्यंत आवश्यक नाही | १ ते ५ वर्षे (कर्जाऊ रक्कम आणि कर्जाच्या प्रकारानुसार) | नाही |
| शेड्युल्ड व्यावसायिक बँका /कमर्शिअल बँक्स (बचत गटांसाठी) | ९ - १२% | •ओळख पत्र<br>•फोटो | रु. २०,००० | नाही | १.५ वर्षे(कर्जाऊ रक्कम आणि कर्जाच्या प्रकारानुसार) | काही प्रकरणात गटाची हमी आवश्यक |
| सहकारी पतसंस्था (क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटी)/ सहकारी बँका (क्रेडिट को-ऑपरेटिव्ह बँक्स) | १०% - २०% | • ओळख आणि निवास पुरावा<br>• मिळकतीचा पुरावा<br>• फोटो | रु. २०,०००-४०,००० | रु. २५,००० च्या कर्जापर्यंत आवश्यक नाही | १ ते ५ वर्षे (कर्जाऊ रक्कम आणि कर्जाच्या प्रकारानुसार) | हो |
| अल्पपतपुरवठा संस्था (मायक्रोफायनान्स इन्स्टिट्युशन्स) | २०% - २८% | • ओळख आणि निवास पुरावा<br>• फोटो | रु. ४०,००० | आवश्यक नाही | १ ते २ वर्षे | हो (गटाची हमी) |
| गृहवित्त संस्था (हाउसिंग फायनान्स इन्स्टिट्युशन्स ) | १५% ते २१% | • ओळख आणि निवास पुरावा<br>• मिळकत आणि नोकरी पुरावा<br>• फोटो<br>• मालत्तेची कागदपत्रे<br>• पूर्वी घेतलेल्या कोणत्याही कर्जाची माहिती | रु. ५०,००० | आवश्यक (काही प्रकरणात गहाण किवा विमा पॉलिसी) | २ ते ७ वर्षे | नाही |

ओळख पुरावा हा पॅन कार्ड, मतदार ओळखपत्र, वाहन परवाना इत्यादी असू शकतो आणि निवासी पुरावा हा मालमत्ता कर, वीजबिल, रेशन कार्ड, बँक विविरणपत्र इत्यादी असू शकतो. जर अर्जदार किंवा कुटुंब यांच्याकडे मिळकत पुरावा नसेल तर अप्रत्यक्ष साधनांचा वापर करून प्रतिनिधी म्हणून काम करणारी संस्था आपली मिळकत तपासून कर्ज देण्यासाठी कदाचित तयार होऊ शकते.

स्वच्छ भारत एक कदम स्वच्छता की ओर

**आपल्या जवळील वित्त संस्थेच्या कार्यालयाकडे जा आणि कर्ज प्रक्रियेबाबत चौकशी करा...**

स्वच्छ महाराष्ट्र अभियान सप्तपदी स्वच्छतेची

अस्वीकृत बाबी: शौचालय बांधण्यासाठी कर्ज घेणे सुलभ होण्याकरिता ही माहिती देण्यात आली आहे. या माहितीच्या अचूकतेसाठी नगरपालिका किंवा इतर कोणत्याही शासनाच्या प्रतिनिधी म्हणून काम करणाऱ्या संस्था जबाबदार नाहीत. *कर्जदाराला माहितीची पडताळणी करावी लागेल आणि स्वत:च्या जबाबदारीवर कर्ज घ्यावे लागेल.*